# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक प्राथम्य**

क्रमांक:-रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२०/का.७
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- २४/११/२०२५

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
(मुंबई शहर, मुंबई उपनगर, भंडारा व गोंदिया वगळून)

विषय :- जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक -२०२५ मतदान केंद्रनिहाय यादी प्रसिध्द करण्यास मुदतवाढ देणेबाबत.
संदर्भ :- आयोगाच्या कार्यालयाची दि. २३/०९/२०२५, दि. २७/१०/२०२५ व दि. ११/११/२०२५ रोजीची पत्रे.

महोदय,

मतदान केंद्रनिहाय यादी प्राप्त करण्यासाठी बुथनिहाय मास्टरची माहिती तसेच मतदान केंद्र निहाय चार्ट अपलोड करण्यात व बुथनिहाय मतदार यादी प्रोसेसची प्रक्रिया पूर्ण होत नसून प्रिंट घेण्यातही अडचणी येत असल्याचे काही जिल्हाधिकारी कार्यालयांकडून कळविण्यात आले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन दि. २३/०९/२०२५ व दि. ०९/१०/२०२५ व रोजीच्या पत्रांद्वारे ३२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमानुसार दि. २७/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याच्या दिनांकास दि. १२/११/२०२५ व दि.११/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये दि. २४/११/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु परिच्छेद क्र.१ मधील परिस्थिती विचारात घेता मतदार यादी तयार करण्याच्या कार्यक्रमात खालीलप्रमाणे अंशतः बदल करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| (i) | मतदान केंद्रांची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | २७/११/२०२५ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपली,

(सु.तु.आरोलकर)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.